# चतुर माधवराव

**गो. ना. (तथा) गोविंद नारायण दातारशास्त्री**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**चतुर माधवराव : गोविंद नारायण दातारशास्त्री**

© **सुरक्षित**

समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

## प्रस्तावना

# चतुर माधवराव

दातार छापखाना स्थापन झाल्यापासून ''शालिवाहनशक'', ''मोलकरीण'' ही दोन पुस्तके पूर्वी प्रसिद्ध झाली; आणि आता हे तिसरे ''चतुर माधवराव'' वाचकांच्या सेवेला सादर होत आहे. आम्ही लिहिलेल्या सर्व पुस्तकाहून याची रचना जरा निराळ्या तऱ्हेची आहे.

आम्ही यापूर्वी ज्या मनोरंजक किंवा बोधपर कादंबऱ्या लिहिल्या त्या सर्व आंग्ल कादंबरीकार रेनॉल्डस् याच्या कादंबऱ्यांची रूपांतरे आहेत. परंतु प्रस्तुत पुस्तक हे कोणत्याही पुस्तकाचे किंवा पुस्तकखंडाचे रूपांतर नसून या सर्व गोष्टी स्वतंत्रपणे लिहिल्या आहेत.

नुकतेच ख्रिस्तवासी झालेले सर ऑर्थर कॉनन डाइल यांच्या ''शेरलॉक होम्स्'' च्या धर्तीवर या सर्व गोष्टी अगदी नवीन रचल्या आहेत. निरीक्षण, चातुर्य, तर्कशुद्ध विचारसरणी, कल्पकता यांच्या पायावर प्रत्येक गोष्टीची उभारणी केली आहे. प्रत्येक गोष्टीत बहुधा काहीतरी नवीन तर्कसरणीचा आश्रय केलेला आढळून येईल आणि प्रथमत: कठिण वाटणाऱ्या कोड्याचा तार्किक पद्धतीने केलेला उलगडा वाचकांचे मनोरंजन करून त्यांच्या तर्कशक्तीस चालना देण्यास साह्य करील, अशा दृष्टीने प्रत्येक गोष्टीची रचना केलेली आहे.

या पुस्तकात 'आद्य' रसाला जागाच नसल्यामुळे हे कित्येकांना रूक्ष वाटेल; परंतु श्रृंगार, ग्राम्यता किंवा अश्लीलता यांपासून या गोष्टी पूर्णपणे अलिप्त ठेवण्याची खबरदारी घेतलेली असल्यामुळे हे पुस्तक तरुणांच्या हाती बिनधोक देता येण्यासारखे आहे. ''कुटुंबातील लहान थोर माणसे एकत्र बसली असता सर्वांसमक्ष जे पुस्तक बिनधोक वाचता येईल, ते पुस्तक चांगले,'' अशी जी विद्वानांनी चांगल्या पुस्तकांची

कसोटी ठरविली आहे त्या कसोटीस हे पुस्तक पूर्णपणे उतरेल असा आम्हास भरवसा वाटतो.

प्रत्येक गोष्टीत माधवराव आणि बळवंतराव अशी दोन पात्रे आहेत. वाचकांनी आपणास माधवराव न समजता बळवंतराव समजून गोष्ट वाचावी, आणि प्रत्येक गोष्टीत जेथे पूर्वरंगाचे दुवे पुरे होतात, तेथे थोडा वेळ थांबून त्या दुव्यांवरून आपणास अनुमानश्रृंखला कितपत तयार करता येते, याचा विचार करावा आणि नंतर उत्तररंग वाचावा. म्हणजे आपल्या तर्कसरणीपेक्षा माधवरावांची तर्कसरणी कशी सूक्ष्म व शुद्ध आहे हे लक्षात येऊन मनाला समाधान झाल्यावाचून राहाणार नाही, असे आम्हास वाटते. या कादंबरीतील सर्व गोष्टी 'मधुकर' मासिकात वेगवेगळ्या वेळी प्रसिद्ध झाल्या आहेत व 'हरवलेली नथ' ही गोष्ट 'चित्रमयजगत्' व 'मधुकर' या दोन्ही मासिकातून प्रसिद्ध झालेली आहे. या गोष्टी जशा त्या वेळी वाचकांस आवडल्या, तशा आताही या स्थायी स्वरूपात आवडतील, अशी अपेक्षा धरणे अस्थानी होणार नाही. अशा प्रकारच्या निरीक्षणविषयक स्वतंत्र लघुकथांची महाराष्ट्र वाङ्मयात फारच उणीव असल्यामुळे हा आमचा प्रयत्न जरी यशस्वी झाला नाही तरी सरस्वतीमंदिराच्या या दालनात प्रवेश करणाऱ्या वाङ्मयसेवकांस 'मागच्याला ठेच पुढचा शहाणा' या न्यायाने हा आमचा अल्प प्रयत्न मार्गदर्शक झाला, तरी त्याने पुष्कळच काम केल्यासारखे होईल.

'शेरलॉक होम्स्' जसा इंग्रजी वाचकांस आवडला व त्याची नव्याजुन्या जगात प्रतिष्ठा झाली तसे भाग्य जरी 'माधवरावास' लाभणे शक्य नाही तरी त्याच्या जनकाच्या या प्रयत्नाबद्दल महाराष्ट्र वाचक त्याचा उपहास तरी करणार नाहीत, अशी आशा बाळगून ही प्रस्तावना पुरी करतो.

सन १९३०

**– गोविंद नारायण दातार**

## *श्री. गोविंद नारायण दातार– यांचे अल्पचरित्र*

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात गो. ना. दातार हे नाव मराठी वाचकांत अत्यंत लोकप्रिय होते. महाराष्ट्राच्या प्रबोधन काळात साहित्यात वैचारिक साहित्य खूप पुढे आले. मात्र तत्कालीन सुशिक्षित, साक्षर अशा सामान्य मंडळींना निखळ मनोरंजनात्मक असे काहीतरी साहित्य हवे होते. ते साहित्य चमत्कारांनी भरलेल्या पुराणांवर आधारित नको होते, पण अतिमानवी नायकाच्या स्वप्नवत् वाटणाऱ्या पराक्रमांनी भरलेले हवे होते. त्यात प्रणय, पराक्रम, वास्तव वाटणारे अद्‌भुत, खलनायकाने निर्माण केलेले अडथळे, नायकाने त्यावर लीलया केलेली मात, खिळवून ठेवणारे पण कादंबरीच्या अंतापर्यंत न उलगडणारे रहस्य असा मसाला हवा होता. वाचकांची ही गरज भागवण्याचे कार्य गोविंद नारायण दातार यांनी केले. मात्र ते स्वप्रतिभेने न करता भाषांतर–प्रतिभेने केले. येथे भाषांतर–प्रतिभा हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यांनी रेनॉल्ड्स या इंग्रजी लेखकाच्या सर्व कादंबऱ्यांचे मराठीत भाषांतर केले. पण ते करताना त्यात भारतीय वातावरण आणि इतिहास यांचा अशा कौशल्याने वापर केला की या कादंबऱ्या परकी साहित्याची भाषांतरे आहेत असे सामान्य वाचकांना वाटलेच नाही आणि पुढे असामान्य झालेल्या कुसुमाग्रजांचे गो. ना. दातारांवरील प्रेम, 'या कादंबऱ्या भाषांतरित आहेत' हे कळूनसुद्धा जराही कमी झाले नाही ! या कादंबऱ्यांनी सामान्यांना किती वेड लावले होते त्याची दोनच प्रतिनिधिक उदाहरणे पहा– श्री. के. क्षीरसागर यांची पुतणी वत्सला– सौ. प्रतिभा कुलकर्णी– माझी सहकारी शिक्षिका होती. त्यांची आठवण– ''माझ्या आईला दातारांच्या कादंबऱ्या वाचण्याचे प्रचंड वेड होते. त्या वेडापायी अनेकदा घरकामाकडे दुर्लक्ष होत असे. एकदा चुलीपुढे बसून कादंबरी वाचताना चुलीवरील पदार्थ करपला. त्यावर भडकून जाऊन वडिलांनी ती कादंबरी तिच्या हातातून हिसकावून घेऊन सरळ चुलीत फेकली.''

जी. ए. कुलकर्णी यांच्या 'काजळमाया'मध्ये 'पुनरपि' ही कथा आहे. त्यातील पुढील भाग पहा– नंतर 'विलासमंदिर !' हे नाव पहाताच तिचे हात थबकले आणि तिला कामाचा विसर पडला... हे पुस्तक तिने वाचायला घेतले तेव्हा दादांनी रागावून ते तिच्याकडून काढून घेतले होते आणि बाजूला टाकले होते. ते वाचायला घेतले की घरात कोणी ना कोणी सहा महिन्यात दगावले होते म्हणे. चाळीस–पंचेचाळीस वर्षांपूर्वी वाचायला उचललेले ते पुस्तक, पण त्यातल्या गौतमीआत्याला कोणते गुपित माहीत होते या बद्दलची माईची उत्सुकता अजूनही तेवढीच तीव्र होती.

आजच्या भाषेत सांगायचे तर गो. ना. दातार हे त्यांच्या काळातच आख्यायिकांचा विषय बनले होते. पण या आख्यायिका त्यांच्या किंवा आमच्या कानावर क्वचितच आल्या.

दातारांचा जन्म १८७६ चा आणि मृत्यू १९४१ मधला. दातार घराणे मूळचे वाडे पडेल मधील (जि. सिंधुदुर्ग) तेथून ते राजापूरला आले. राजापुराचा पश्चिम भाग हा त्याकाळी धोपेश्वरगाव म्हणून ओळखला जात असे. या गावात धोपेश्वराचे कुळ म्हणून ते स्थायिक झाले. बहुधा दातारांचे आजोबा इथे प्रथम आले. गो. ना. दातारांची पत्नी (माझी आजी) पोंभुर्ल्याच्या करंदीकरांकडची. ती विंदा करंदीकरांची मावशी. गो. ना. दातारांना एक मुलगी आणि सहा मुलगे. दातारांच्या विद्वत्तेमुळे त्यांच्याकडे काही विद्यार्थी संस्कृत शिकायला येत. त्यातील एक दत्तात्रेय हरि मराठे– माझे वडील–होत. त्यांचा आणि काशी दातार हिचा प्रेमविवाह झाला आणि आमचा दातार घराण्याशी कायमचा संबंध जुळला.

आपल्या कादंबऱ्या छापण्यासाठी दातारांनी स्वत:चा छापखाना सुरू केला. (त्याचा इतिहास 'शालिवाहन शक' कादंबरीच्या प्रस्तावनेत आहे.) यासाठी त्यांनी मुंबईच्या बॉटलीबाय कंपनीकडून जर्मन ट्रेडल मशीन विकत आणले. त्याच्याबरोबरच विजेवर मशीन चालवण्याला आवश्यक जोडण्या मिळाल्या (त्या ४५ वर्षांनी उपयोगात आल्या!) निर्णयसागरमधून टाईप आणि अन्य साहित्य आणले. ही घटना १९२३ मधील आहे. छपाई यंत्राबरोबर कागद कापण्याचे जिलोटिन मशीनही आले. या छापखान्यात स्वत: लेखक आपल्या १४–१५ वर्षांच्या मुलांची थोडी मदत घेत. लेखनापासून प्रकाशनापर्यंतची खिळे जुळणी, मुद्रणशोधन, छपाई, पुस्तक बांधणी इ. सर्व कामे एकहाती करीत होता ! मुखपृष्ठ चिकटवायला लागणारी मैद्याची खळ लेखकाच्या हातची. एवढेच नव्हे तर खराब झालेले रूळ लेखकच सरस कुटून, पातळ करून साच्यात ओतून बनवत होता. छपाईयंत्रावर एका वेळी अष्टमांश आकाराची दोन पाने छापता येत. त्यावर 'शालिवाहन शक', 'मोलकरीण' या कादंबऱ्या, शेरलॉक होम्सच्या कथांवर आधारलेले पण बरेच स्वतंत्र असे 'चतुर माधवराव' हे रहस्यकथांचे मराठीतील पहिले पुस्तक, शिशुविनोद पुस्तकमाला मधील 'खांबावरील पुतळी, खुळा राक्षस, कनकपुरी' ही छोटी पुस्तके. 'वैदिक वैश्वानराग्नि' म्हणजेच 'उत्तरारुण प्रकाश' या नावाचा 'टिळकांच्या आर्यांचे वसतिस्थान उत्तरध्रुव होते.' या कल्पनेला पुष्टी देणारा शोधनिबंध इतकी पुस्तके छापली गेली. त्याशिवाय लग्नपत्रिका, मुंजपत्रिका, दुकानांची पावतीपुस्तके, हँडबिले यांची भरपूर कामे मिळत जाऊन व्यवसायही उत्तम झाला. घराच्या मोठ्या पडवीत असलेल्या या छापखान्यामुळे आमचे 'मामाचे घर', 'छापखाना' झाले. आम्ही अजूनसुद्धा 'छापखान्यात' जातो; मामाच्या गावाला नाही ! हा छापखाना अजून चालू आहे.

गो. ना. दातार हे विविधांगी व्यक्तिमत्त्व होऊन गेले. त्यांचे लेखन विविधांगी आहे. त्यांनी 'श्रीशिवछत्रपतींचे चरित्र' लिहिले. ते चैत्र वद्य ११, शके १८२८ (मार्च–एप्रिल १९०६) मध्ये नारायण रामचंद्र सोहोनी यांनी 'जगदीश्वर' छापखान्यात छापून प्रकाशित केले. एकनाथी भागवत, रंगनाथी योगवसिष्ठ, ज्ञानेश्वराची गाथा, श्रीसमर्थ रामदास स्वामींचे समग्र ग्रंथ यांचे सटीप संपादन केले. भट्टमोरेश्वर विरचित 'वैद्यामृत', 'शिवस्वरोदय' हा योगशास्त्रावरील लहान ग्रंथ, 'रामगीता' 'अध्यात्मरामायण', नारायण दैवज्ञ लिखित 'मुहूर्तमार्तंड', 'गणेशपुराण', 'पद्मपुराण' यांची भाषांतरे केली. या ग्रंथांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना त्यांच्या विद्वत्तेबरोबरच त्यांच्यावरील टिळकप्रभावही स्पष्ट करतात. त्यांचे खगोल, भूगोल आणि गणित यांचे ज्ञान उत्तम होते. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पास पर्यंत होते, ते एम्. ए. नव्हते. ते काँग्रेसचे प्रचारक आणि राजापूर तालुका काँग्रेस कमिटीचे काही वर्षे अध्यक्ष होते. घराशेजारी असणाऱ्या हिरण्यकेशीय वेदपाठशाळेचे पदाधिकारी आणि विश्वस्त होते.

'कादंबरीकार' होण्यापूर्वी ते घरी आयुर्वेदिक औषधे बनवीत. त्यासाठी त्यांनी 'रसायनशाळा' हा कारखाना काढला होता. त्यात त्यांनी 'नारायणज्वरांकुश' या स्वत: शोधलेल्या गोळ्यांची निर्मिती होत असे. आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांना दम्याचा त्रास वारंवार होऊन प्रकृती बिघडू लागली. दीर्घ आजारानंतर ते ६५ वर्षांचे असताना मरण पावले.

आजोबांचा ग्रंथसंग्रह मोठा होता. त्यात संस्कृतसाहित्य, वेदान्त, खगोल, आयुर्वेद यांचा भरणा आहे. राजवाड्यांची काही पुस्तके आहेत. 'ग्रांट डफाचा इतिहास' हे शिळाप्रेसवर छापलेले पुस्तक आहे. शिळाप्रेसवर छापलेली १५० वर्षे वयाची पुस्तके आहेत. त्यात समग्र मोरोपंत आणि रामायणाचे मराठी भाषांतर आहे. इंग्रजी पुस्तकात रेनॉल्ड्स, आर्थर कॉनन डॉइल आहेत. स्ट्रँड व मिस्टरी मासिकांचे जुने अंक आहेत.

आज गो. ना. दातारांची आम्ही २३ नातवंडे आपापल्या क्षेत्रात, मुंबई, पुणे, चिपळूण, कोल्हापूर, बंगलोर आणि राजापूर येथे परस्परांशी प्रेमाचे संबंध ठेवून आहोत. त्यात सात आतेभाऊ, दोन आत्तेबहिणी (मराठे), आठ मामेभाऊ आणि सहा मामेबहिणी (दातार) आहेत. गो. ना. दातारांचे पाचवे पुत्र मोहन हे मे २००६ मध्ये राजापूर मुक्कामी मरण पावले. तीन सुना आम्हा भाचे, पुतणे मंडळींना आशीर्वाद द्यायला आमच्यात आहेत.

**– श्री. अ. द. मराठे**
१६८/१० शांतीनाथ अपार्टमेंट,
यशवंतनगर, तळेगाव दाभाडे,
जि. पुणे–४११ ५०७

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | भुताटकी-१ | ............... | ९ |
| २) | दुहेरी लोभ | ............... | ३२ |
| ३) | पुत्रप्रेम की धनलोभ? | ............... | ४९ |
| ४) | माझा खादीचा पोषाख | ............... | ६९ |
| ५) | तीन लक्षांची चोरी | ............... | ८४ |
| ६) | जुगाराचा भयंकर परिणाम | ............... | १०४ |
| ७) | नवरदेवाचे पलायन | ............... | १२५ |
| ८) | सनदेचा शोध | ............... | १४३ |
| ९) | छतावरची खूण | ............... | १५७ |
| १०) | भुताटकी-२ | ............... | १७० |
| ११) | हरवलेली नथ | ............... | १९३ |
| १२) | तांब्याची पट्टी | ............... | २०८ |
| १३) | वादीचा सांधा | ............... | २२९ |


✦✦✦